# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/१२/२०१६

**१) शेतातुन धानाच्या बोऱ्यांची चोरी . :–**

दिनांक २६+२७/१२/२०१६ चे रात्र. दर. यातील फिर्यादी नंदुलाल आसाराम अंबुले वय ४२ वर्ष, यांनी आपल्या शेतात चुरना करुन ठेवलेले जयश्रीराम जातीचे २४ बोरे धानापैकी ०३ बोरे धान कि. ३५,०००/–रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने कुणी नसल्याची संधी साधुन चुन्हाड शेतशिवार येथुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन दामदुप्पट केलेल्या रकमेची अफरातफर केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २७/१२/२०१६ चे १८.०० वा. दर. यातील आरोपी हे सेफ महाबचत गटाचे संचालक असुन फिर्यादी हे सन २०१० पासुन महाबचत गटा मध्ये गुंतवणुकदार असुन दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन मासीक बचत ठेवीवर साडेसात वर्षात दाम दुप्पट करुन देतो म्हणुन १८,९००/–रु. व अवीरत ठेवीवर साडे तिन वर्षात दाम दुप्पट करुन फिर्यादीने भरना केलेल्या ६२,९००/–रु. ठेवीत हित संरक्षण करण्याची जबाबदारी असतांना रकमेची आरोपीतांनी अफरातफर करुन फसवणुक केल्याने फिर्यादी गौतम पतीराम माने वय ४० वर्ष, रा. सुभाष वार्ड वरठी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४०९,४२०,३४ भादवी. सहकलम ३ एम.पी.आय.डी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. खंडाते पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) वनविभागाच्या चौकीतील ठेवलेल्या सार्वजनीक मालमत्तेची नुकसान व जाळपोळ केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २६/१२/२०१६ चे रात्र दर. यातील वनविभागाची कक्ष क्र. १६९ गराडा (जंगल) गाव शेजारील अवैद्य शिकार प्रतीबंधक चौकी अज्ञात आरोपीतांनी मिळुन कॅम्प मध्ये ठेवलेली लोखंडी पेटी दरवाजा, खिडकी (लाखडी),कोठी स्वयंपाकचे भांडे, पलंग असे मिळुन ५०,०००/–रु. चे सार्वजनीक मालमत्तेची नुकसान व जाळपोळ केल्याने फिर्यादी सुरज प्रभाकरराव गोखले रा. गणेशपुर राउड ऑफीसर डोडमाझारी कोका यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४३५, भादवी. सहकलम ४ हानी प्रतीबंधक कायदा १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २७/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, आंधळगाव, साकोली व लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४९ लिटर हातभट्टी दारु कि. २,५००/–रू. व ८ लिटर ६४० मिली लिटर देशी+सायकल कि. ४,६६८/–रु. तसेच जुगारातुन कि. ११३/–रु. असा एकुण किंमती ४,७८१/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २७/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ तिन सिटर वाहनांवरती १२ केसेस व ईतर वाहनांवरती ६७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.